<u>जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर</u>

# लाकडी फर्निचर दुरुस्तीचे कामाचे निविदा (दरपत्रक) मागविण्याबाबत सूचना

माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपूर यांचे आदेशान्वये सुचित करण्यात येते की, जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर येथील लाकडी फर्निचर दुरुस्तीची कामे करण्याकरीता सन २०२१-२०२२ या वर्षाकरीता स्थानिक लाकडी फर्निचर दुरुस्ती करणा-यांकडून/कंत्राटीदाराकडून खालीलप्रमाणे नमूद लाकडी फर्निचर दुरुस्ती कामाचे <u>निविदा (दरपत्रक)</u> मागविण्यात येत आहे.

| अनुक्रमांक | कामाचे स्वरुप |
|---|---|
| १ | लाकडी खुर्च्यांची सीट केनिंग करणे |
| २ | लाकडी खुर्च्यांची बॅक केनिंग करणे |
| ३ | लाकडी खुर्च्यांची सीट व बॅक केनिंग करणे |
| ४ | लाकडी खुर्च्यांची हात दुरुस्ती करणे |
| ५ | लाकडी खुर्च्यांची पाय दुरुस्ती करणे |
| ६ | लाकडी खुर्च्यांना लोखंडी ४ पट्टी लावणे |
| ७ | लाकडी टेबलांना लोखंडी ४ पट्टी लावून दुरुस्ती करणे |
| ८ | टेबलांचे ड्रावरची दुरुस्ती करणे |
| ९ | टेबलांचे फाटक दुरुस्ती करणे |
| १० | टेबलांची साईड दुरुस्ती करणे |
| ११ | बेंचांची हात दुरुस्ती करणे |
| १२ | बेंचांची पाय दुरुस्ती करणे |
| १३ | बेंचांना लोखंडी ४ पट्टी लावून दुरुस्ती करणे |
| १४ | आलमा-यांना कडीकोंडा बसविणे |
| १५ | आलमा-यांना टिचकणी बसविणे |
| १६ | आलमा-यांना पट्टी लावून दुरुस्ती करणे |
| १७ | कॉम्प्युटर टेबल दुरुस्ती करणे |
| १८ | जुन्या नादुरुस्त आलमा-यांपासून नावाच्या पाटया तयार करणे<br>(लाकडी साहित्य न्यायालयामधील राहील)<br>(अ) न्यायालयाकरीता<br>(ब) कर्मचा-यांकरीता |
| १९ | जुन्या नादुरुस्त आलमारी व फर्निचरपासून फूटरेस्ट बनविने (प्रती नग) |
| २० | लाकडी आराम खुर्च्या दुरुस्ती करणे |
| २१ | भिंतींवर पडदयांचे रॉड लावणे |
| २२ | भिंतीवर न्यायालयाच्या नावाच्या पाटया लटकविणे |
| २३ | भिंतीवर आरसा बसवून देणे |

| | |
|---|---|
| २४ | भिंतीवर कपडा हॅंगर बसवून देणे |
| २५ | भिंतीवर नोटीस बोर्ड बसवून देणे |
| २६ | लाकडी पेटी दुरुस्ती<br>(४ लोखंडी पट्‌टी लावून कडीकोंडा बसविणे) |
| २७ | फुटरेस्ट दुरुस्ती करणे |
| २८ | वेळेवर येणारे फर्नीचर संबंधी किंवा इतर किरकोळ दुरुस्ती |
| २९ | लाकडी टेबल टॉप नवीन बसविणे<br>१) साईज मोठा - 4½ x 2½ फुट<br>२) साईज मध्यम - 4 x 2 फुट<br>३) साईज लहान - 3 x 2 फुट |
| ३० | वर्कशॉप टेबलचे टॉप फिटींग करुन देणे |
| ३१ | लाकडी रॅंका दुरुस्ती करणे |
| ३२ | लाकडी स्टूल दुरुस्ती करणे |
| ३३ | साक्षीदाराचा कटघरा दुरुस्ती करणे |
| ३४ | साक्षीदाराचा कटघरा पॉलीश करणे |
| ३५ | तक्रारपेटया दुरुस्त करणे |
| ३६ | डायसवरील संपूर्ण लाकडी फर्निचरला पॉलीश करणे |
| ३७ | टेबलांना प्लायवूड लावून सनमायका लावणे |
| ३८ | लाकडी कपाटांचे पॉलीश करणे व काच लावणे |

**कंत्राटीदारांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त दरपत्रकातील नमुद बाबी क. १ ते ३८ चे दर तुलना केल्यावर ज्यांचे जास्तीत जास्त बाबींचे दर कमी असेल त्यांचे सोबत उपरोक्त सर्व बाबींचे काम करण्याचा करार करण्यात येईल तसेच असेही स्पष्ट करण्यात येते की, प्राप्त झालेल्या दरपत्रकातील सर्वात कमी दर ज्यांचे असेल त्याच कमी दरानुसार ज्यांच्याशी करार करण्यात येणार आहे त्याला त्याच कमी दरानुसार काम करावे लागेल.**

इच्छूक कंत्राटीदारांना याव्दारे सुचित करण्यात येते की, त्यांनी जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर येथील ७ वा माळा, आस्थापना विभागाचे कार्यालयात दरपत्रके बंद लिफाप्यात **रोज मंगळवार दिनांक ३०.०३.२०२१ रोजीचे ५.०० वाजेपावेतो** सादर करावे.

लिफाप्यावर **" लाकडी फर्निचर दुरुस्तीचे कामाचे निविदा (दरपत्रक) "** असे नमूद करावे व माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपूर यांचे नावाने लिफाफा पाठवावा.

उपरोक्त दरपत्रक सुचना https://districts.ecourts.gov.in/nagpur किंवा https://court.mah.nic.in/courtweb या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले आहे.

दिनांक २३/०३/२०२१.

आदेशान्वये,

23/3/21

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, नागपूर